# कलाशिक्षण

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - साहित्य सहकार, संपा. ग त्र्यं माडखोलकर, साहित्य सहकार संघ लि., मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, जुलै १९६९)

वास्तविक पाहता संगीतशिक्षणाच्या समस्या या मूळात कलाशिक्षणाच्या समस्या असल्याने त्यांचा वेगळा विचार करणे कितपत शक्य व योग्य आहे असा प्रश्न पडेल. परंतु कलाशिक्षणाबाबत उद्भवणाऱ्या समस्या दोन वर्गात मोडतात हे लक्षात घेतले पाहिजे. काही समस्या अशा असतात की ज्या सर्वच कलांना सारख्या असतात. उदाहरणार्थ, कलाशिक्षणाचा उद्देश काय असावा या विषयीचे गैरसमज (समाज, सरकार वा संस्था यांच्या मनात असलेले) सर्वच कलांच्या शिक्षणाबाबत अडथळा निर्माण करतात. उदाहरणार्थ, कलाशिक्षणाचा उद्देश कलावंत निर्माण करण्याचा असावा (ज्याप्रमाणे वैद्यकीय शिक्षण देऊन वैद्य, स्थापत्यशास्त्र शिकवून स्थापत्यविशारद तयार होतो त्याचप्रमाणे कलांच्या बाबतीत व्हावे) हा गैरसमज सर्वच कलांना नडतो. याखेरीज कलाशिक्षणात अशाही काही समस्या आहेत की ज्या विशिष्ट कलांपुरत्याच मर्यादित आहेत. उदाहरणार्थ, वैयक्तिक लक्ष देऊन गुरुशिष्य परंपरेने शिक्षण देणे हे संगीतासारखे चित्र इत्यादी कलांत आवश्यक आहे का? चित्र इ. दृश्यकलांमध्ये कालसंबद्ध आविष्कार विपुल असल्याने इतिहास, तंत्रविज्ञान इत्यादी अनुषंगिक गोष्टींचे ज्ञान या क्षेत्रातील विद्यार्थ्यांबाबत महत्त्वाचे ठरते तितके ते संगीतादी कलांबाबत प्रस्तुत ठरते का? इत्यादी. यातून अर्थातच दोन्ही कलांच्या शिक्षणाबाबत काही विशिष्ट समस्या (त्या त्या कलांपुरत्याच मर्यादित राहणाऱ्या) निर्माण होतात हे स्पष्ट व्हावे. मुद्दा असा की संगीतशिक्षणातील समस्याही याच प्रकारे दोन वर्गात विभागून विचारात घ्याव्या लागतील. सर्व कलांना सारख्या असणाऱ्या शिक्षणसमस्या आणि नंतर संगीतक्षेत्रापुरत्या मर्यादित असणाऱ्या शिक्षणसमस्या असा हा क्रम राहावा.

कलाशिक्षणाचा उद्देश कलावंत निर्माण करण्याचा असावा या समजामुळे उभ्या राहणाऱ्या समस्या जबरदस्त आहेत. कारण एकदा हे मूलविधान मान्य केले की कलावंत 'निर्माण' करणे हे स्वरूपतः अशक्य असल्याने कलाशिक्षणाचे शेकडा ९० प्रयत्न ही उधळपट्टी ठरते. आणि असल्या अनुत्पादक कामाकडे आपुलकी राहू द्या, सहानुभूतीने पाहण्यासही कोणी तयार नसतो. तेव्हा मुळात हे लक्षात घ्यायला पाहिजे की कलाशिक्षणाचा उद्देश कलावंत निर्माण करण्याचा असतो हे फार मर्यादित अर्थाने खरे आहे. कलासंबद्ध तांत्रिक आणि शिकविण्यासारख्या गोष्टींचे शिक्षण देणे, त्या बाबतीतले आडाखे, तोडगे, पद्धती वगैरे समजावून सांगून विशिष्ट कार्यक्षमता आणि कौशल्य प्राप्त करून देणे, आणि या सर्व तांत्रिक बाजूपलीकडे कुठे तरी 'कलावंततत्व' असते याची जाणीव करून देणे हे कलाशिक्षणाचे काम असते. म्हणजे प्रत्यक्षतः कलाशिक्षणामुळे साधक कलेच्या जाणीवेपर्यंतच जातो. आणि आविष्कारातील आवश्यक ती फक्त तांत्रिक कौशल्येच कलाशिक्षण त्याच्या हातात देऊ शकते. संगीताबाबत (मी फक्त गायन-वादनाबाबत बोलत आहे) असे म्हणता येईल की आवाज तयार करून घेणे, वाद्याबाबतीत हात वाद्यावर नीट 'ठेऊन' घेणे, ताल, स्वर, राग इ. विषयी आवश्यक ती सामुग्री (अनुक्रमे ठेके वा बोल, स्वरस्थाने, चिजा इ.) उपलब्ध करून देणे या व अशा गोष्टींचेच शिक्षण देता येईल. कलावंत कसे बनावयाचे हे सांगता यायचे नाही पण कलावंत म्हणजे काय याबद्दल कल्पना देता येईल. जिथून साधकाला कलेचे सुजाण दर्शन होईल अशा टप्प्यापर्यंत त्याला नेऊन सोडणे आणि आविष्कारार्थ लागणाऱ्या तांत्रिक कौशल्यांवर विशिष्ट दर्जाचे प्रभुत्व आणि अंमलबजावणीतील क्षमता त्याच्या अंगी आणणे एवढेच कलाशिक्षणाचे काम आहे. याशिवाय कशाचीही अपेक्षा ठेवणे आणि मग तिची पूर्ती झाली नाही म्हणून कलाशिक्षण हे निरुपयोगी वा अनुत्पादक म्हणणे यात कलास्वरूपाविषयी अज्ञान दिसते आणि कलाशिक्षकावर व साधकावर विनाकारण अन्याय होतो.

कलाशिक्षणाच्या अभ्यासक्रमाबाबतही अशाच सार्वत्रिक समस्या आहेत. सर्व विद्यार्थ्यांना सारखा अभ्यासक्रम असणे इष्ट आहे का? कला ही गोष्टच मुळी (समष्टीशी निगडित असली तरी) व्यक्तीतून उद्भूत होणारी आहे, तिचे परिणाम सामाजिक असले तरी निर्मिती वैयक्तिक असते इ. विधानांच्या पार्श्वभूमीवर अभ्यासक्रम प्रत्येक विद्यार्थ्याच्या लायकीनुसार, क्षमतेनुसार वेगवेगळा असावा असे वाटेल. पण इथे पुन्हा एकदा कलाशिक्षणाच्या उद्देशाविषयींचे विवेचन ध्यानात आणावे. विद्यार्थ्यानुसार अभ्यासाचा क्रम बदलावा पण अभ्यासक्रम तोच ठेवावा असा निष्कर्ष काढता येईल. म्हणजे असे की तांत्रिक कौशल्ये आणि क्षमता या गोष्टी प्रत्यक्ष ताडून पाहता येत असल्याने त्यांच्या बाबतीत अर्थातच एक पक्का आराखडा ठरवता येतो आणि या आराखड्याच्या कोणत्याही टप्प्यापर्यंतचा विद्यार्थी असला तरी तांत्रिक बाबींत त्याचे अंतिम साध्य कोणते व त्यासाठी त्याला किती वाटचाल करावयाची आहे हेही निश्चित समजते. त्यानुसार विशिष्ट विद्यार्थ्यांच्या बाबतीत विशिष्ट गोष्टींवर भर दिला पाहिजे इ. बारीकसारीक तडजोडी केल्या की काम भागते. संपूर्ण अभ्यासक्रमाचा आराखडा विद्यार्थ्यानुसार बदलण्याची गरज न भासता काही तपशील मागेपुढे करणे इतकेच आवश्यक ठरते. तेव्हा कलाशिक्षणाच्या उद्दिष्टानुसार पाहता प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वेगळा अभ्यासक्रम ठेवण्याची गरज नाही. गायनाबाबतीत उदाहरण घ्यावयाचे तर असे म्हणता येईल की आवाज सर्व लयीत स्वच्छ फिरला पाहिजे ही तांत्रिक क्षमता सर्वांना सारखीच, फक्त कोणाच्या गळ्यात गमकेची तान असेल नसेल ते पाहून त्यावर कमीअधिक भर द्यावा इतकेच. अभ्यासक्रम तोच ठेऊन अभ्यासाचा क्रम बदलावा असे म्हटले ते या अर्थाने.

सर्व कलाशिक्षणात जाणवणारी तिसरी उणीव म्हणजे कलाविज्ञानाच्या स्वतंत्र अभ्यासाची कुठेच सोय नाही आणि त्याचप्रमाणे अशा अभ्यासाच्या स्वयंपूर्ण महत्वाची जाणीवही नाही. प्रत्येक कलासमीक्षकाला "तुला यातले प्रत्यक्ष काही करता येत नाही. मग नुसता बोलतोस (वा लिहितोस) कशाला?" असा जो हास्यास्पद प्रश्न विचारला जातो त्यात कलाविज्ञानाच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयीचे अज्ञान प्रगट होत असते. कलाविष्कार करणे या एकाच हेतूने कलेविषयी शिक्षण घेणारा प्रेरित असतो (आणि तसाच तो असावा) असे धरून कलेविषयी विचार केल्याने कलाशिक्षण घेणाऱ्याची कुचंबणा केली जाते. कलाविचार, कलासमीक्षा आणि कलाविष्कार ह्या कलाव्यवहाराच्या सारख्याच महत्त्वाच्या तीन अवस्था होत. कलाविचार हा जीवनातील इतर क्षेत्रांशी कलेचा संबंध कोणत्या स्वरूपाचा असतो हे शोधीत असतो, कलासमीक्षा ही कलेचेच स्वरूप समजून घेण्याच्या प्रयत्नात असते, तर कलाविष्कार कलानुभवास प्रत्यक्षरूप देत असतो, असे या तिन्हींचे वर्णन करता येईल. या तिन्हींना कलाशिक्षणात स्थान मिळाले पाहिजे आणि या तिन्हींचे कार्य, अस्तित्वकारण, अभ्यासपद्धती या बाबतीतले स्वातंत्र्य मान्य केले पाहिजे. एकाच अभ्यासकाने कलाव्यवहाराची ही तिन्ही अंगे परिपुष्ट करण्याचा चंग बांधला तर अर्थातच हरकत मुळीच नाही. पण यातल्या कोणत्याही एका अंगाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्याने दुसऱ्या अंगावरही प्रभुत्व दाखविले पाहिजे अशी अपेक्षा करून आपली स्वतःची भूमिका नीट बजावण्याचे त्याचे स्वातंत्र्य हिरावले जाता कामा नये. कलाशिक्षणात या विचारधारेचे मनःपूर्वक स्वागत व त्याचा प्रामाणिक अंतर्भाव न होण्यात कलाव्यवहार खुरटा राहतो हे जाणण्याची वेळ आता निश्चित आली आहे.

कलाव्यवहाराचे व्यापक स्वरूप जाणून घेऊन ज्याप्रमाणे कलाशिक्षणाला नवीन आशय देण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे कलाशिक्षणाचा चेहरामोहराही बदलण्याचीही गरज आहे. कलाशिक्षण म्हणजे अतिशय हालअपेष्टात, अवहेलना सोशीत करीत राहण्याचे दिव्य असे त्याचे उग्र चित्र कायम गिरवित राहण्याची गरज नाही. एकाग्र चित्ताने, निष्ठेने आणि कसोशीने प्रयत्न करूनच कुठल्याही ज्ञानशाखेत प्रवेश आणि प्रगती होत असते. कलाशिक्षणाचे वैशिष्ट्य ह्या साऱ्या क्रिया अधिक निष्ठुरपणे, कडवेपणे पार पाडण्यात असते असा समज पोसला जाऊ नये. कलाशिक्षण म्हणजे ज्याप्रमाणे हसतखेळत शिकविणारी माँटेसरी नव्हे त्याचप्रमाणे मनावर उगाचच विलक्षण ताण घेऊन, जीवनाला कडवटपणे सामोरी जाणारी शुष्क हठयोगी साधना नव्हे. कलाशिक्षणाच्या

कठीणपणाचा बाऊ न करता, साधकाचा आत्मविश्वास आरंभापासूनच खच्ची करणाऱ्या गूढवादी दंतकथांनी कलेचे प्राणाहुती मागणारे स्वरूपच बिंबवत न राहता, साधकाचा कलाविश्वात ज्यामुळे प्रवेश होईल अशा शिक्षणपद्धतीचा अवलंब करणे आता जरूर आहे.

याचाच अर्थ असा की कलाशिक्षणाचा इतर क्षेत्रातील शिक्षणपद्धतीशी समन्वय झाला पाहिजे. ज्यामुळे साधकाच्या हाती असलेल्या ज्ञानाची त्याला मिळणार असलेल्या ज्ञानाशी सांगड घातली जाईल; ज्यामुळे ज्ञान म्हणजे अनुकरण असे न वाटता व्यक्तिगत अनुभव असे ज्ञानाचे स्वरूप त्याच्या लक्षात येईल; आणि ज्यामुळे त्याने आत्मसात केलेल्या कलानुभवाने त्याच्या एकंदर भावविश्वाची अर्थपूर्ण संगती लागेल; अशा सर्व पद्धतींचा कलाशिक्षणात अवलंब झाला पाहिजे. यामुळे आज कलाशिक्षणात फुकट जाणारा साधकाचा वेळ, त्याचे श्रम आणि यामुळे त्याला हमखास येणारे नैराश्य यांची कलाक्षेत्रातून हकालपट्टी करता येईल. कलाशिक्षणात काय किंवा इतरत्र काय शॉर्ट कटस् वा पळवाटा नसतात हे मान्य आहे. पण साधनेला अधिक अनुकूल मार्गच नाहीत असे प्रतिपादन करणे म्हणजे केवळ आंधळेपणा आहे. आजच्या दृक्श्राव्य माध्यमांच्या जमान्यातही घोकंपट्टीद्वारेच भाषा शिकणे-शिकविणे हे जसे हास्यास्पद झाले आहे, तोच प्रकार कलाशिक्षणातही आहे. नवीन साधने, नवीन पद्धती, शिक्षणक्षेत्रातील नवीन दृष्टिकोन अशा साऱ्यांचा मागोवा घेत घेत यापुढे कलाशिक्षणाने आपला मार्ग चोखाळला पाहिजे. कलाशिक्षण मागासलेले राहूनही कलाभ्यास आणि कलाविकास मात्र प्रगत होत राहतील असे समजणे म्हणजे आपल्या पायावर धोंडा पाडून घेणेच आहे.

ज्याप्रमाणे कलाशिक्षण आणि इतर ज्ञानशाखांतील शिक्षणपद्धती यांची सांगड घातली गेली पाहिजे त्याचप्रमाणे खुद्द कलाक्षेत्रातही अधिक निकटचे आंतर-कला-संबंध प्रस्थापित झाले पाहिजेत आणि त्यांचे प्रतिबिंब कलाशिक्षणात दिसले पाहिजे. कला, ज्ञानशाखा यांच्यांत पद्धती, दृष्टिकोण या अमूर्त पातळीवर देवाणघेवाण होते, तर निरनिराळ्या कलांत अनेक वेळा प्रत्यक्षातल्या समस्या सोडविण्याच्या मूर्त पातळीवरही परस्पर व्यवहार होतो. जसजशा कला प्रगत होतात तसतसे त्यांचे आकलन हे स्वेतर कलांच्या आकलनावर अवलंबून राहते हा विचार काही नवीन नाही. पण आमच्या कलाशिक्षणात त्याचे अस्तित्व फार झाले तर तात्त्विक पातळीवरच जाणवते. इतर कलांची ओळख आणि जमल्यास अभ्यास हे प्रत्येक कलोपासकाने आपले कर्तव्य मानले पाहिजे. आणि विशेष अभ्यासाचा विषय म्हणून कोणतीही कला समोर असली तरी तिचे दर्शन कलाकुटुंबातील एक कला म्हणून होईल याची खबरदारी सर्व कलाशिक्षणात सतत घेतली गेली पाहिजे. इतर कलांच्या संदर्भात विशिष्ट कला पाहणे हे अभ्यासकाच्या दृष्टीने अंगभूत महत्त्वाचे ठरेल अशा तऱ्हेने इतर कलांची ओळख तपशील, आकडेवारी, सनावळ्या इ.ची अडगळ बाजूला सारून करून दिली जाणे आवश्यक आहे. ‘आपल्या अभ्यासाचा विषय असलेली कला ही नाट्य, चित्र इ. संमिश्र आणि व्यामिश्र आविष्कारांत कोणत्या भूमिकेत वावरते’ या व अशासारख्या मूलभूत प्रश्नांद्वारे अभ्यासकास विचार करावयास लावले पाहिजे. सर्व कलाक्षेत्र हे एकाच चैतन्यतत्त्वाने भारले गेले आहे अशी प्रतीती अभ्यासकाला येईल इतके आमचे कलाशिक्षण जीवंत आणि 'निश्चितदिश' झाले पाहिजे.

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे सर्व कलांना लागू होणारे, सर्व कलांच्या शिक्षणाबाबत उद्भवणारे असे काही प्रश्न आहेत. त्यांचा विचार वर केला आहे. याखेरीज प्रत्येक कलेचे म्हणून काही स्वतंत्र प्रश्न त्या त्या कलेच्या वैशिष्ट्यानुसार त्या त्या कलेच्या शिक्षणाबाबत उद्भवणार. संगीतशिक्षणाबाबत असे काही खास प्रश्न आहेत आणि त्यांचा विचार स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे.